# भारतीय संगीत आणि प्रयोगशीलता

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - साहित्य सहकार, संपा. ग त्र्यं माडखोलकर, साहित्य सहकार संघ लि., मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन, ऑगस्ट १९६९)

प्रयोगशीलता हा एक आकर्षक शब्द आहे. ह्याचे आकर्षण का वाटावे याला अनेक कारणे आहेत. पैकी महत्त्वाचे कारण असे की व्यवहारात या शब्दाबरोबर अनेक तऱ्हेच्या भावनांना आवाहन करणाऱ्या अर्थच्छटा निगडित आहेत. उदाहरणार्थ, प्रयोगशील असणे म्हणजे कृतिशील राहणे, जी कृती करू ती नवीन असणे आणि त्यात भागीदार नसणे असे मनात कुठेतरी वाटत असते. या सर्व छटांत मानवी 'अहं'ला सुखविण्याची शक्ती आहे आणि त्यामुळे प्रयोगशीलता ही संज्ञा मूल्यवाचक बनली आहे. सर्व तऱ्हेच्या मानवी प्रयत्नांचे नियमन करण्याची, त्यांचे नियंत्रण करण्याची, मूल्यांची क्षमता लक्षात घेता, मूल्याकडे अनिवार्यपणे ओढ घेणाऱ्या प्रयोगशीलतेसारख्या संज्ञेचे स्वरूप एखाद्या विशिष्ट व्यवहाराच्या अधिक मूर्त पातळीवर तपासणे हे आवश्यक ठरते. अशा तऱ्हेच्या प्रयत्नाने संज्ञेचा अर्थ तर नेमका होतोच, पण तिच्यामुळे सूचित होणाऱ्या व्यवहारातही अधिक डोळसपणा येण्याची शक्यता निर्माण होते. भारतीय संगीताच्या संदर्भात प्रयोगशीलतेचा विचार हाती घ्यायचा तो या पार्श्वभूमीवर.

भारतीय संगीतात प्रयोगशीलता कोणत्या तऱ्हेने कार्यकारी झालेली आढळते असा जर प्रश्न विचारला तर अशा दोन तऱ्हा डोळ्यापुढे येतात. एक तर भारतात प्रचलित असलेल्या हिंदुस्थानी आणि कर्नाटकी या दोन संगीतपद्धतीतली देवाणघेवाण किंवा त्यांचा एकमेकांवर झालेला असर, आणि दुसरी म्हणजे पाश्चात्त्य चित्रपट आदींच्या प्रभावाने आपल्या सांगीतिक आविष्कारात वा आविष्कार तंत्रात झालेले बदल. या दोन्हीचा थोडा अधिक विचार करू.

दक्षिण भारतीय वा कर्नाटकी संगीतपरंपरेतून हिंदुस्थानी पद्धतीत होणारी नवीन रागांची आयात हा प्रयोगशीलतेचा आविष्कार तत्त्वतः स्वागतार्ह आहे. दक्षिणेतून राग आणणे आणि असलेल्या रागात चीज बांधणे यात सहजासहजी नवीनता हाती लागण्याच्या दृष्टीने रागांची आयात सोपी म्हटली पाहिजे, कारण संबंध चौकट दाक्षिणात्य संगीतातून उचलली आणि त्यात कोणतेही (नेहमीचे) शब्द बसविले की नावीन्य हाती लागते. अर्थात अशा नवीन रागांच्या सौंदर्यस्थलांची, सामर्थ्याची आणि शक्यतांची नेमकी जाणीव होणे हे काही तितकेसे सोपे नाही. पण एकंदरीने माहीत असलेल्या, रूढ झालेल्या रागांत नवीन चीजा रचून, किंवा आहे त्याच चीजांची पुनर्रचना करून नावीन्याचा प्रत्यय आणून देण्यापेक्षा नवीन रागचौकटीची आयात करणे हा मार्ग निःसंशयपणे सोपा आहे. आणि अशा सोप्या मार्गाचा अवलंब होणे हे आमच्या प्रयोगशीलतेच्या क्षीणपणाचे द्योतक तर नाही ना अशी शंका मनाला चाटून गेल्याशिवाय राहात नाही. (दाक्षिणात्य राग बाजूला ठेवले तरी एरवी नवीन राग गाण्यावाजवण्याकडे नसलेला बहुसंख्य लोकांचा कल हेही या संदर्भात चिंत्य आहे.) कदाचित, आयात-युग तात्पुरते असेल, आणि हे आयात राग स्थिरावले की मग आहेत त्यांची सुप्त सामर्थ्ये धुंडाळण्याची चळवळ सुरू होईल अशी भविष्यवाणी करता येईल. किंबहुना, भारतातील प्रत्येक संस्कृतिप्रवाहाला आपल्याखेरीज दुसरेही प्रवाह आणि विशेषे करून कलाविचार अस्तित्वात आहेत याची जाणीव (साम्य आणि अंतर दोन्हीचे आकुंचन होत असता) होणे, हे स्वाभाविक आणि स्वागतार्ह आहे असेही म्हणणे शक्य आहे. पण तरीही, संस्कृतिप्रवाहांना इतरांची जाणीव ठेवूनही आपले स्वतःचे विकसन, संवर्धन, आपले संशोधन कसोशीने करून साधता येणार नाही का? सरसकट आयातीपेक्षा आपली

आधारभूमी अधिक सुफला करणे अधिक समंजस नाही का? असे अनेक प्रश्न या बाबतीत उभे राहतातच आणि त्यांना अगदी डावलून चालणार नाही हे उघडच आहे.

या घाऊक आयातीमुळे हिंदुस्थानी संगीतात रूढ असलेले काही संकेत खिळखिळे होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ, विशिष्ट राग विशिष्ट वेळी गावयाचा वा वाजवावयाचा हा हिंदुस्थानी संगीतपरंपरेतला रूढ नियम बिनधोकपणे आणि डोळे झाकून राबविणे चारुकेशी, किरवाणी इ. रागांबाबत जमत नाही. मग हा राग सकाळपासून रात्रीपर्यंत केव्हाही आविष्कृत झालेला दिसतो. इतकेच नव्हे तर, या आविष्कार-समयातल्या फरकामुळे त्याच्या आस्वादनात फरक न झाल्याचेही लक्षात येते. असेच दुसऱ्याही अनेक रागांच्या बाबतीत होण्याची शक्यता आहे आणि असे झाले की काही स्वरूपगत नसलेल्या संकेतांच्या पकडीतून हिंदुस्थानी संगीत जरासे मुक्त होऊ शकेलही.

रागांच्या आयातीखेरीज चाली आणि लकबी यांचीही आयात दक्षिण भारतीय संगीत परंपरेतून झाली आहे. महाराष्ट्रात तरी निदान, नाट्यसंगीताने आपली नावीन्यप्रियता कर्नाटकी परंपरेवर पोसली आहे. लकबींच्या संबंधी बोलावयाचे तर कर्नाटकी गमकांचा प्रवेश आमच्या आविष्कारात (मुख्यत्वेकरून गायनात) जरा अधिक राजरोस होत आहे असे आढळते. ही लकब जर आमच्या 'अलंकारांच्या' पातळीवर जाऊन बसली तर काय होईल हा प्रश्न आज विचारात घेण्याइतका तिचा उपयोग सर्रास नाही ही गोष्ट जरी खरी असली, तरी असे झालेच तर हिंदुस्थानी संगीताच्या एकंदर गानोच्चारास ही गोष्ट परकी वाटेल एवढे नमूद करणे जरुर आहे.

कर्नाटकी परंपरेकडून हिंदुस्थानी संगीतपरंपरेने काय काय घेतले याचा विचार करताना तालवाद्यांच्या आजच्या वाढत्या महत्त्वाविषयीही एक विचार सुचतो. गायन किंवा वादन काय, दोन्ही बाबतीत दक्षिणी परंपरेत तालवाद्याचे महत्त्व जरा जास्त असते. साथ करण्याबरोबरच आपले कौशल्य स्वतंत्रपणे दाखविण्याचा मोका दक्षिणी तालवाद्यवादकांना नेहमीच मिळतो. किंबहुना कर्नाटकी संगीतात एकाच वेळी मुख्य कलावंत आणि साथीदार तालवाद्यवादक यांचा 'स्वतंत्र कार्यक्रम' होतो असे म्हणण्याइतका 'मृदंगम्' वा 'घटम्' वादक कृतिशील असलेला दिसतो. हिंदुस्थानी पद्धतीतील तंतुवाद्यवादकांत मध्येमध्ये तबलजीला बरेच वाजवून देणे व तेव्हा आपण 'लेहरा' धरून बसणे हा प्रकार कनार्टकातूनच शिरला काय अशी शंका येते. ज्या पं. रविशंकर, इ. तंतुवाद्यवादकांनी तबलजींना इतके मोकळे सोडले त्यांनीच कर्नाटकी रागांची आयातही मोठ्या प्रमाणावर करावी ही घटना काही केवळ योगायोग म्हणून बाजूला करण्याइतकी फुटकळ नाही. या दक्षिणी पद्धतीचा आविष्कार एकंदरीने पाहता विलंबित लयीत नसतो हे लक्षात घेता, तालवाद्यांचे प्रभावी अस्तित्व स्वाभाविक वाटेल; पण हिंदुस्थानी पद्धतीच्या प्रकृतीत (आविष्कारातील विलंबित भागाचे प्रमाण लक्षात घेता) हे मानवणारे आहे का असा प्रश्न सहजच उभा राहतो आणि या संदर्भात विचार करता साथीदाराचे हे स्वतंत्रवादन घातक आहे असा निर्णय नोंदविणे अपरिहार्य ठरते.

पाश्चात्त्य संगीताचा आमच्यावर झालेला परिणाम आमच्या चित्रपटसंगीताबाबतीत जितका सर्वस्पर्शी आहे तितका शास्त्रोक्त संगीताबाबत अर्थातच नाही. पण तरीही काही आविष्कार-प्रकार आणि आविष्कार-तंत्रे या बाबतीत शास्त्रोक्त संगीतावरही पाश्चात्त्य संगीताने असर केला आहे. वृंदवादन, नृत्यनाट्य, संगीतक हे संगीतप्रकार आमच्याकडे मुळे धरू पाहात आहेत ते पाश्चात्त्य परंपरेतून स्फूर्ती घेऊनच. (समूहगानाकडेही याचप्रमाणे लक्ष दिले पाहिजे असे इथे सुचवावेसे वाटते.) आविष्कारतंत्राचा विचार करता आमच्या वादकांनी स्वरसंगती तत्त्वाचा (हार्मनीचा) वादनात उपयोग करण्याचे प्रयत्न मोठया कसोशीने चालविलेले आहेत हे लक्षात येते.

आविष्कारप्रकारांबाबतीत असे निश्चित म्हणता येईल की त्या तऱ्हेचे वा ते प्रकार भारतीय परंपरेत सजविण्याचे प्रयत्न स्वागतार्ह आहेत. कारण विविध आविष्कारप्रकार म्हणजे कलाव्यवहारातील रूपबीजांची विविधांगी वाढ होय आणि यात मूळ रूपबीजांचे स्वरूप विकृत होण्याचा धोका कमी. हे आविष्कारप्रकार कलादृष्ट्या यशस्वी होतील तरी किंवा निष्फळ ठरतील, पण भारतीय संगीताच्या गाभ्यास, उदाहरणार्थ स्वरसंहतीस (मेलडीस), धक्का लावणार नाहीत. शिवाय या आविष्कारप्रकारांपैकी बरेचसे प्रकार इतर कलांशी संगीताचा संयोग होऊन निर्माण झाले आहेत. तेव्हा हे नीटपणे प्रस्थापित झाल्यास आमचा समग्र कलाव्यवहारच अधिक संपन्न व बहुरंगी होऊ शकेल. हा संभव निखालसपणे आशादायक आहे.

पाश्चात्त्य आविष्कारतंत्राबाबत मात्र आपण थोडेसे अधिक सावध राहिले पाहिजे. कारण त्या तंत्राबरोबर आपण खोल मुळे असलेली भिन्न स्वरूपी आणि भिन्न दिशेने जाणारी कलाजाणीवही अजाणता आणत असतो. आणि याचे कलम स्वदेशीय कलापरंपरेवर आणि जाणीवेवर काहीच किंमत न देता करता येईलच असे सांगता येत नाही. किंमत द्यावी लागली तरी हरकत नाही, पण मग किती घेतले, किती गमावले याची जरा काळजीने तपासणी केल्याखेरीज पुढे पाऊल न टाकणेच बरे असते. उदाहरणार्थ, अधिक खोलात जाऊन एखाद्या संकल्पनेचा विस्तार असे भारतीय संगीताचे ध्येय आहे, असे ढोबळपणे म्हणण्यास हरकत नाही. उलटपक्षी, एकाच वेळी अनेकांचे उपयोजन करून एक बहुरंगी, प्रभावी 'झोत' निर्माण करणे हे पाश्चात्त्य संगीतपरंपरेचे उद्दिष्ट मानता येईल. आपापल्या उद्दिष्टानुसार स्वरसंहती आणि स्वरसंवाद या आविष्कारतंत्रांचा अनुक्रमे भारतीय आणि पाश्चात्त्य परंपरांनी स्वीकार केला आहे. तेव्हा या पार्श्वभूमीवर पाहता एकाच्या तंत्राचे अनुकरण दुसऱ्यानी करण्यात काय मतलब आहे? संगीताविष्काराचे प्रयोजन बदलल्यास तंत्राची तदनुसार केलेली उसनवारी वा राबवणूक अर्थातच आक्षेपार्ह ठरत नाही. आणि याचे प्रत्यंतरही आमच्या चित्रपटसंगीतात येते. भारतीय अभिजात संगीताचे प्रयोजन काही बदलता येणे शक्य नाही, तेव्हा आविष्कारतंत्राचे बदल करण्यात आपली हालचाल सावधपणे व्हावी हा इशारा मनात ठसविला पाहिजे. आधुनिक प्रयोगसाधनांचा (उदा. ध्वनिक्षेपक, टेपरेकॉर्डर इ.चा) प्रयोग हाही असाच काळजीपूर्वक केला जाणे आवश्यक आहे. पाश्चात्त्य आविष्कारतंत्राशी या प्रयोगसाधनांची आता इतकी घट्ट सांगड घातली जात आहे की आविष्काराची आणि तंत्राची परिणामकारकता वाढविणारे घटक हे प्रयोगसाधनांचे मूळ स्वरूप नाहीसे होऊ लागले आहे. प्रयोगसाधनांच्या आत्यंतिक उपयोगाबाबत धोक्याची सूचना देणे हे जरूर झाले आहे ते यासाठीच होय.

दाक्षिणात्य आणि पाश्चात्त्य संगीतपरंपरांतून स्फूर्ती घेऊ पाहाणाऱ्या प्रयोगशीलतेचे हिंदुस्थानी शास्त्रोक्त संगीताच्या संदर्भात जे विवेचन केले आहे, त्यास दिलेल्या शीर्षकात मात्र भारतीय संगीत असा निर्देश का असा प्रश्न पडेल. यास कारणे दोन. एक तर पाश्चात्त्य संगीतापासून स्फूर्ती घेऊन कार्यान्वित झालेल्या प्रयोगशीलतेसंबंधीचे विवेचन दाक्षिणात्य संगीताबाबतही लागू पडेल. कारण तंत्र, आविष्कार-घटक इ. बाबतीत जरी हिंदुस्थानी व दाक्षिणात्य पद्धतीत भेद असला तरी 'एकातून विस्तार' हे उद्दिष्ट दोन्हीकडे अंतिम ध्येय म्हणूनच वावरते. आणि दाक्षिणात्यांकडून हिंदुस्थानी पद्धतीत होणाऱ्या आयातीत प्रयोगशीलतेने जी पथ्ये पाळावीत असे सुचविले आहे, तीही दाक्षिणात्यांनी हिंदुस्थानी पद्धतीतून स्फूर्ती घेऊन केलेल्या प्रयोगाबाबत पाळावीत इतक्या तात्त्विक, अमूर्त स्वरूपाची आहेत.

झालेल्या चर्चेच्या आधारे संगीत आणि प्रयोगशीलता यांचा संबंध काय या प्रश्नाच्या विचारास मार्गदर्शक अशी काही सर्वसामान्य सूत्रे हाती लागतात :

१) संगीतास क्रांती, उत्क्रांती वा विकास यापैकी काहीच मंजूर नाही. संगीतात वाजवी ठरतो तो फक्त बदल.

२) असा बदल घडतो तो केवळ तंत्र, आविष्कार-घटक इ.च्या आयात-निर्यातीमुळे घडत नसून त्याचा संबंध समाजाच्या संस्कृती संचिताशी पोचत असतो. यामुळे बदल ही घटना जीवनाच्या पृष्ठभागावर उठणाऱ्या तात्पुरत्या तरंगासारखी (उदा. कपड्यातील

फॅशन्सप्रमाणे) नसते. संगीतात बदल होतो तेव्हा राज्यक्रांती होते असे कोणीसे म्हटले आहे ती केवळ अतिशयोक्ती नसावी असे या संदर्भात विचार करता पटू लागते.

३) प्रयोगशीलता हे सांगीतिक बदल करण्याच्या इच्छेचे द्योतक असतेच असे म्हणणे कठीण आहे. परंतु अशा प्रयोगशीलतेतून सांगीतिक बदल घडवून आणणाऱ्या शक्तींची निर्मिती होणारच नाही असेही म्हणता येत नाही. याच संबंधात प्रयोगशीलतेची सर्वच फलिते नेहमीच उपकारक ठरतात असे नाही हेही ध्यानात घेतले पाहिजे.

४) प्रयोगशीलता उपकारक आणि फलदायी होण्यास परंपरेस जमेला धरूनच तिने पुढे जाणे आवश्यक आहे. परंपरेतल्या चैतन्यहीन भागाचे, रूढीचे बांडगूळ प्रयोगशीलतेने छाटले तरी हरकत नाही. पण असे करताना परंपरेच्या जीवनस्रोतास गढूळ न करण्याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे प्रयोगशीलतेची कल्पनाच मुळात आकर्षक असते. परंतु 'येन केन प्रकारेण' प्रयोगशील राहणे ही गोष्ट समाजमनाच्या प्रयोग करणाऱ्याच्या मानसिक अप्रगल्भतेची द्योतक म्हटली पाहिजे. प्रयोगाआधी अस्तित्वात असलेल्या परंपरेचे सहृदय आकलन आवश्यक आहे. या आकलनाने उपलब्ध असेल त्यांतल्या सामर्थ्यशक्यतांची नेमकी जाणीव होते आणि यांचा शोध प्रथम घेतला पाहिजे. असा शोध घेऊन आढळणाऱ्या असंवर्धित आविष्कारशक्तीची वाढ होऊ देणे ही क्रिया कलाव्यवहारास अधिक जवळची आहे. बाहेरून नवीन लावण्यापेक्षा आतून नवीन येऊ द्यावे. अंतिम दृष्ट्या हीच प्रक्रिया अधिक फलदायी ठरते. कलाव्यवहारात आढीला घालून फळ मुद्दाम पिकविण्याची प्रयोगशीलता मंजूर नाही.

---